17 OCT 2026

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठ शहराचे 'हरित फुप्फुस'

जैवविविधतेचा ८५३ एकरांमध्ये अनमोल ठेवा; १३ हजारांहून अधिक वृक्ष, १२६ पक्षीप्रजाती

संतोष मिठारी : सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. १६ : उच्च शिक्षणाचे केंद्र असलेले शिवाजी विद्यापीठ जैवविविधता संवर्धन आणि पर्यावरणीय समतोलाचेही महत्त्वपूर्ण उदाहरण ठरत आहे. तब्बल ८५३ एकरांवर विस्तारलेल्या विद्यापीठाच्या परिसरात १३ हजारांहून अधिक वृक्ष, पक्ष्यांच्या १२६ प्रजाती, फुलपाखरांच्या सुमारे ६४ प्रजाती आणि विविध प्रकारच्या वनस्पती व वन्यजीवांचा अधिवास आहे. पश्चिम घाटाच्या जैविक समृद्धीशी नाते सांगणारा हा परिसर कोल्हापूर शहरासाठी नैसर्गिक हरित फुप्फुस म्हणून महत्त्वाची भूमिका बजावत आहे.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाचा परिसर कोल्हापूर शहरासाठी 'नैसर्गिक हरित फुप्फुस' म्हणून महत्वाची भूमिका बजावत आहे.

वृक्षसंवर्धन, दुर्मीळ वनस्पतींचे जतन, पाणीसाठा निर्मिती आणि वन्यजीवांना अनुकूल अधिवास या उपक्रमांमुळे विद्यापीठाचा परिसर पर्यावरण संवर्धनाचे एक आदर्श मॉडेल म्हणून विकसित होत आहे. शहरातील वाढते नागरीकरण, वृक्षतोड, तापमानवाढ आणि पाण्याची वाढती गरज या पार्श्वभूमीवर विद्यापीठातील हिरवाई आणि नैसर्गिक साधनसंपत्तीचे महत्त्व अधिक आहे. विद्यापीठाचा उद्यान विभाग परिसरातील वृक्षसंपदा आणि बागांचे संवर्धन करतो. शिक्षण आणि संशोधनासोबतच पर्यावरणाचे रक्षण कसे करता येते, याचे प्रात्यक्षिकच येथे पाहायला मिळते.

वृक्षसंपदेमुळे परिसराला नैसर्गिक संरक्षण

विद्यापीठात कडुनिंब, चिंच, साग, बाभूळ, रिठा, साल, कैलासपती आणि गोरखचिंच यांसारख्या वृक्षांचीही विविधता आढळते. या वृक्षांमुळे कार्बन शोषण, स्थानिक तापमान नियंत्रण, मृदासंवर्धन आणि पक्ष्यांना घरटी बांधण्यासाठी अधिवास उपलब्ध झाला आहे.

सह्याद्रीच्या कुशीत वसलेल्या ८५३ एकरांचा शिवाजी विद्यापीठाचा विस्तीर्ण परिसर आणि त्याच्या मध्यभागी असलेला छत्रपती शिवाजी महाराज यांचा अश्वारुढ पुतळा सर्वांना प्रेरणादायी आहे. शिक्षण, संशोधन आणि वृक्ष, पाणी, वन्यजीवांचे संरक्षण अशा दुहेरी भूमिकेतून विद्यापीठाचा परिसर विकसित होत आहे. कोल्हापूर शहराचे हरित फुप्फुस असलेला हा ठेवा जतन करणे ही आपल्या सर्वांची सामूहिक जबाबदारी आहे.

- डॉ. आर. के. कामत, कुलगुरू

पक्षी, फुलपाखरे आणि वन्यजीवांचा अधिवास

विद्यापीठ परिसरातील जैवविविधतेचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे येथे आढळणारे पक्षी आणि वन्यजीव. परिसरात पक्ष्यांच्या १२६ प्रजातींची नोंद झाली असून, विविध ऋतूंमध्ये सुमारे ६० ते ६४ प्रकारची फुलपाखरे आढळतात. फुलपाखरांची उपस्थिती ही परिसरातील वनस्पती, फुलोरा आणि पर्यावरणीय परिस्थितीशी संबंधित आहे. परिसरात १ हजार ५०० हून अधिक मोर आहेत.

झाडे, पाण्याचा साठा वाढविणार

- विद्यापीठाचा परिसर सुंदर आणि निसर्गस्नेही बनवण्यासाठी पहिले कुलगुरू अप्पासाहेब पवार यांच्यापासून सुरुवात झाली. विद्यापीठाच्या प्रत्येक कुलगुरूंनी यामध्ये लक्ष देऊन ते वाढविण्यासाठी प्रयत्न केले. त्यातून आज विद्यापीठ जलस्वयंपूर्ण झाले आहे. विद्यापीठात सध्या शंभरहून अधिक प्रकारची झाडे आहेत. त्यांची संख्या वाढवणे आणि पाण्याचे साठे व साठा वाढविण्याचा प्रयत्न असल्याचे कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी सांगितले.

विद्यापीठाची जैवसमृद्धी

- विविध ऋतूंत आढळणारी फुलपाखरे - ६४ प्रजाती
- लीड बोटॅनिकल गार्डनचे क्षेत्रफळ - ४२ एकर
- बोटॅनिकल गार्डनमधील वृक्षप्रजाती - ५००
- स्थानिक वनस्पतींच्या प्रजाती - १५०
- पक्षी, सरीसृप, उभयचर आणि सस्तन प्राणी - १२३ पृष्ठवंशी प्रजाती
- पश्चिम घाटातील अतिथोकाग्रस्त स्थानिक वनस्पतींचे संवर्धन - २० प्रजाती
- परिसरातील पाणीसाठ्याची क्षमता - ३४ कोटी लिटर
- जलसंवर्धनाची प्रमुख साधने - २ तलाव, विहिरी - १०, शेततळी - २४

लीड बोटॅनिकल गार्डन... दुर्मीळ वनस्पतींचे संवर्धन

लीड बोटॅनिकल गार्डनमध्ये वनस्पतींचा अभ्यास, दुर्मीळ प्रजातींचे जतन, बीजसंग्रह, पुनर्वसन आणि पर्यावरणविषयक जनजागृती केली जाते. या गार्डनमधील पाम वृक्षांचा संग्रह हे आणखी एक आकर्षण आहे.

येथे २५ हून अधिक देशी पाम प्रजातींचे संग्रह, प्रजनन आणि परिचयाचे काम केले जाते. परिसरात १०० हून अधिक पाम प्रजातींचा संग्रह आहे.

जलस्वयंपूर्णतेकडे वाटचाल

विद्यापीठाने पावसाचे पाणी साठविणे, तलावांची निर्मिती, विहिरींचे पुनरुज्जीवन, पाण्याचा पुनर्वापर अशा विविध उपाययोजनांवर भर दिला आहे. वर्ष २०१६ मध्ये परिसरात सुमारे २८ कोटी लिटर पाणीसाठ्याची क्षमता निर्माण झाली होती.

त्यानंतरच्या उपाययोजनांमुळे ही क्षमता ३४ कोटी लिटरपर्यंत पोहोचली आहे. त्यामुळे विद्यापीठाने जलस्वयंपूर्णतेकडे वाटचाल केली आहे.

17 OCT 2026

तरुण भारत

ज्ञान व शिक्षण व्यवहारात आणले पाहिजे : डॉ. शिंदे

कोल्हापूर : विद्यार्थ्यांनी प्राध्यापक सोबत इतर क्षेत्रातही नोकरीच्या संधी शोधल्या पाहिजेत. आपले शिक्षण व ज्ञान व्यवहारात उपयोगात आले पाहिजे, असे प्रतिपादन कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी व्यक्त केले. शिवाजी विद्यापीठाच्या हिंदी विभागामध्ये एम.ए. हिंदीमध्ये विशेष प्राविण्य मिळविल्याबद्दल दर्शन चौगले व हर्षिता माने या मेधावी विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून बँक ऑफ बडोदाचे विभागीय प्रमुख प्रकाश जाधव, वरिष्ठ व्यवस्थापक विजय कांबळे उपस्थित होते. यावेळी राजभाषा अधिकारी पल्लवी कोहार, सुयोग पाटील यांनी मार्गदर्शन केले. डॉ. तृप्ती करेकट्टी यांनी प्रास्ताविक केले. डॉ. प्रकाश निकम, सारिका कांबळे यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. जयसिंग कांबळे यांनी आभार मानले. यावेळी डॉ. संतोष कोळेकर, संशोधक, विद्यार्थी उपस्थित होते.

जनसपर्क कक्ष
17 OCT 2026 जनप्रवास शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

डॉ. धनंजय पाटील यांच्या 'मॉडर्न नेटबॉल' पुस्तकाचे कुलगुरुंच्या हस्ते विद्यापीठात प्रकाशन



जनप्रवास : कोल्हापूर

आजरा महाविद्यालयातील शारीरिक शिक्षण संचालक डॉ. धनंजय जयसिंगराव पाटील (कुर्लीकर) यांनी लिहिलेल्या 'मॉडर्न नेटबॉल' या पुस्तकाचे प्रकाशन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. राजनीश कामत व प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांच्या हस्ते करण्यात आले.

नेटबॉल खेळातील तंत्रशुद्ध मार्गदर्शन, विविध कौशल्ये, नियम व नियमावली, स्पर्धांचे आयोजन आणि विद्यापीठस्तरीय स्पर्धांच्या नियोजनासह खेळाची सविस्तर माहिती या पुस्तकात समाविष्ट करण्यात आली आहे. त्यामुळे हे पुस्तक खेळाडू, प्रशिक्षक, पालक, पंच, शारीरिक शिक्षणाचे विद्यार्थी तसेच नेटबॉल क्षेत्रात संशोधन करणाऱ्या अभ्यासकांसाठी उपयुक्त मार्गदर्शक ठरेल, असे प्रतिपादन कुलगुरू डॉ. राजनीश कामत यांनी केले.

नेटबॉल खेळाच्या तांत्रिक व शास्त्रशुद्ध प्रशिक्षणासाठी तसेच क्रीडा क्षेत्रातील अभ्यासकांना उपयोगी ठरणाऱ्या स्वरूपात संदर्भ साहित्य उपलब्ध होणे महत्त्वाचे आहे. या दृष्टीने डॉ. धनंजय पाटील यांचे 'मॉडर्न नेटबॉल' हे पुस्तक खेळाच्या विकासासाठी महत्त्वपूर्ण ठरेल, अशी अपेक्षा या वेळी व्यक्त करण्यात आली.

या प्रकाशन सोहळ्यास प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव, अधिसभा सदस्य डॉ. रघुनाथ ढमकले, मुकुंद भावे, गुरुप्रसाद खानोलकर, अनिरुद्ध कोल्हापुरे, शिवाजी विद्यापीठाचे शारीरिक शिक्षण संचालक डॉ. शरद बनसोडे, वरिष्ठ महाविद्यालयीन शारीरिक शिक्षण शिक्षक संघाचे अध्यक्ष डॉ. प्रशांत पाटील आणि ज्योती लेंगारे उपस्थित होते.

डॉ. पाटील यांच्या पुस्तक प्रकाशनाबद्दल जनता एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष अशोक चराटी, उपाध्यक्ष विलास नाईक, मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. अनिल देशपांडे, सचिव रमेश कुरुणकर, सर्व संचालक, सल्लागार, प्रभारी प्राचार्य डॉ. किरण पोतदार, उपप्राचार्य दिलीप संकपाळ, पर्यवेक्षक मनोज पाटील, कार्यालय अधीक्षक योगेश पाटील तसेच सर्व शिक्षक यांनी अभिनंदन केले आहे.

17 OCT 2026

लोकमत



शिवाजी विद्यापीठात डॉ. धनंजय पाटील यांच्या 'मॉडर्न नेटबॉल' या पुस्तकाचे प्रकाशन कुलगुरू डॉ. राजनीश कामत आणि प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांच्या हस्ते झाले.

'मॉडर्न नेटबॉल' पुस्तकाचे प्रकाशन

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : आजरा महाविद्यालयाचे शारीरिक शिक्षण संचालक डॉ. धनंजय पाटील (कुर्लीकर) यांनी लिहिलेल्या 'मॉडर्न नेटबॉल' या पुस्तकाचे प्रकाशन शिवाजी विद्यापीठात कुलगुरू डॉ. राजनीश कामत आणि प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांच्या हस्ते करण्यात आले.

नेटबॉल खेळातील तंत्रशुद्ध मार्गदर्शन, विविध कौशल्ये, खेळाचे नियम व नियमावली, स्पर्धांचे आयोजन तसेच विद्यापीठस्तरीय स्पर्धांचे नियोजन यांसह नेटबॉलविषयीची माहिती या पुस्तकात समाविष्ट आहे. हे पुस्तक खेळाडू, प्रशिक्षक, पालक, पंच, शारीरिक शिक्षणाचे विद्यार्थी आणि नेटबॉल क्षेत्रात संशोधन करणाऱ्या अभ्यासकांसाठी उपयुक्त ठरेल, असे प्रतिपादन कुलगुरू डॉ. कामत यांनी केले.

शारीरिक शिक्षण संचालक डॉ. शरद बनसोडे, वरिष्ठ महाविद्यालयीन शारीरिक शिक्षण शिक्षक संघाचे अध्यक्ष डॉ. प्रशांत पाटील आणि ज्योती लेंगारे उपस्थित होते.

17 OCT 2026

पुढारी



'मॉडर्न नेटबॉल' क्रीडा पुस्तकाचे लोकार्पण

कोल्हापूर : आजरा महाविद्यालयातील शारीरिक शिक्षण संचालक डॉ. धनंजय जयसिंगराव पाटील (कुर्लीकर) यांनी लिहिलेल्या 'मॉडर्न नेटबॉल' या माहिती पुस्तकाचे लोकार्पण शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. राजनीश कामत व प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांच्या हस्ते झाले. यावेळी अधिसभा सदस्य डॉ. रघुनाथ ढमकले, मुकुंद भावे, गुरुप्रसाद खानोलकर, अनिरुद्ध कोल्हापुरे, शिवाजी विद्यापीठाचे शारीरिक शिक्षण संचालक डॉ. शरद बनसोडे, वरिष्ठ महाविद्यालयीन शारीरिक शिक्षण शिक्षक संघाचे अध्यक्ष डॉ. प्रशांत पाटील आणि ज्योती लेंगारे उपस्थित होते.